RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक १०३] मंगळवार, नोव्हेंबर ९, २०२१/कार्तिक १८, शके १९४३ [पृष्ठ १, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २००**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग (परिवहन)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ नोव्हेंबर २०२१.

## अधिसूचना

क्रमांक एमव्हीआर-११२१/प्र.क्र. १३५/परि-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संघटनेने त्यांच्या विविध मागण्यांकरिता बेमुदत संप पुकारल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी, नागरिकांची गैरसोय होऊ नये यास्तव, प्रस्तावित संपाच्या कालावधीत प्रवासी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना विनिर्दिष्ट करणे आवश्यक आहे, असे शासनास वाटते.

त्याअर्थी, आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) चे कलम ६६ चे उप-कलम (३) चा खंड (एन) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे सर्व खाजगी प्रवासी बसेस, स्कूल बसेस, कंपनीच्या मालकीच्या बसेस व मालवाहू वाहने यांना प्रवासी वाहतूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

दिनांक ८ नोव्हेंबर २०२१ च्या मध्यरात्रीपासून प्रस्तावित संप/आंदोलन ज्यावेळी मागे घेतले जाईल त्यावेळी सदर अधिसूचना रद्द समजण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र होळकर,**
शासनाचे सह सचिव.



भाग चार-ब-२००—१

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.